स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (पश्चिम),
ता.वसई,जि.पालघर, पिन- ४०१ ३०३.

दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र. : वविशम/अति.आयुक्त/१०८/२०२६
दिनांक : २८/०७/२०२६

# -: जाहिर आवाहन :-

वसई- विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, इमारत मालक, भोगवटादार व रहिवाशांना कळविण्यात येते की, भारतीय हवामान विभागाने (IMD) पालघर जिल्ह्यासाठी दिनांक 04 जुलै ते 08 जुलै या दरम्यान "रेड अलर्ट" जारी केला होता. यावेळी अतिमुसळधार पाऊस, जोरदार वारे व स्थानिक पातळीवर अतिवृष्टी झालेली आहे. अशा परिस्थितीत जुन्या तसेच संरचनात्मक दुष्ट्या कमकुवत इमारतींना धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील कलम 264 अन्वये धोकादायक व अतिधोकादायक (C-1) म्हणून घोषित करण्यात आलेल्या इमारतींमधील सर्व रहिवाशांनी तात्काळ इमारत रिकामी करुन सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे व महानगरपालिकेने वेळोवेळी दिलेल्या नोटिसा व सूचनांचे काटेकोर पालन करावे. याचबरोबर, वसई-विरार शहरात अलीकडील काळात धोकादायक म्हणून घोषित नसलेल्या काही इमारतींमध्येही छत/स्लॅब कोसळण्याचा घटना घडल्या आहेत. तयामुळे इमारतीच्या वयाची पर्वा न करता सर्व गृहनिर्माण संस्था, इमारत मालक व व्यवस्थापन यांनी पात्र संरचनात्मक अभियंत्याकडून दरवर्षी इमारतींचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) लेखापरिक्षण करुन घेणे तसेच अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती, मजबुतीकरण प प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करणे आवश्यक आहे.

<u>धोकादायक इमारतीचे लक्षणे</u> :-

- बीम, स्लॅब, स्तंभ किंवा भिंतीना मोठे तडे जाणे.
- कॉंक्रिट निखळून लोखंडी सळया उघडया दिसणे.
- स्तंभ, भिंती किंवा इमारत झुकलेली दिसणे.
- स्लॅब किंवा प्लास्टर मोठया प्रमाणात पडणे.
- इमारतींतून असामान्य आवाज येणे.
- पावसामुळे गळती होऊन संरचनात्मक नुकसान दिसून येणे.

**<u>नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी</u> :-**

- धोकादायक इमारतीत वास्तव्य करुन नये.
- इमारतीमध्ये धोक्याची लक्षणे दिसल्यास तात्काळ तज्ञ संरचनात्मक अभियंत्याचा सल्ला घ्यावा.
- महानगरपालिकेच्या संबंधित विभागास माहिती घ्यावी.
- आवश्यक असल्यास तात्काळ इमारत रिकामी करुन सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

**महत्वाची सूचना –**

धोकादायक इमारतींबाबत महानगरपालिकेने दिलेल्या आदेशांचे पालन न करणे, तसेच इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) न करणे किंवा अहवालानुसार आवश्यक दुरुस्ती न करणे यामुळे कोणतीही दुर्घटना, छत/स्लॅब कोसळणे, इमारतींचा काही भाग किंवा संपूर्ण इमारत कोसळणे, जीवितहानी अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधित इमारत मालक, विकासक, सहकारी गृहनिर्माण संस्था/सोसायटी, भोगवटादार व व्यवस्थापन पूर्णपणे जबाबदार राहील, अशा घटनांसाठी वसई-विरा शहर महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

**<u>नागरिकांना कळकळीचे आवाहन</u> –**

**"आपला जीव अमूल्य आहे, कृपया इमारतींची नियमित संरचनात्मक तपासणी करुन आवश्यक दुरुस्ती करा. धोकादायक इमारती तात्काळ रिकाम्या करा आणि प्रशासनाला सहकार्य करा."**

आपत्कालीन परिस्थितीत पुढील दुरध्वनी क्रमांकवर **0250-2334546/2334547/ 8669976101/ 7058911125** संपर्क साधावा.

पृथ्वीराज बी.पी.(भा.प्र.से.)
आयुक्त 27/7
वसई-विरार शहर महानगरपालिका